# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन,(दक्षिण कक्ष), बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४
दूरध्वनी : २७५७१६७३, २७५७०१६६ व २७५७८४०९
ई-मेल : ms@mjp.gov.in/ cao@mjp.gov.in


जा.क्र.मजीप्रा-२०२३/प्र.क्र.६३/बैठक-१५५/आ-४, दिनांक :-२३/०१/२०२४

प्रति,
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (व्यय) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय** : दिनांक ९ जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५५व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

दिनांक ९ जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५५व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

मान्यतेने.

आपली विश्वासू,
DSD 23/1/24

सोबत :- इतिवृत्ताची प्रत

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

**प्रत :** मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई, यांचे माहितीसाठी.

सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.**
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर अमरावती/नागपूर.

मोन - Publish करा


| म.जी.प्रा. नवी मुंबई | |
|---|---|
| उप अभियंता | 2/2 |
| शाखा | आय.टी. सेल |
| आवक क्र. | 2024315044 |
| दिनांक:- | 2/2/24 |

Recd

- अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.
- उप अभियंता (आय.टी.सेल), मित्तल चेंबर्स, मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर योग्य ती कार्यवाही त्वरित करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५५व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५५वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली ७वा मजला, मुख्य इमारत, परिषद सभागृह क्र.५, मंत्रालय, मुंबई येथे मंगळवार दिनांक ९ जानेवारी, २०२४ सकाळी ११.०० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) श्री.डॉ. गोविंदा राज, प्रधान सचिव, नगर विकास विभाग (न.वि.२), मंत्रालय मुंबई तथा प्राधिकरणाचे सदस्य
३) श्री.संजय खंदारे, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई तथा प्राधिकरणाचे सदस्य
४) श्री.अभिषेक कृष्णा, सदस्य सचिव म.जी.प्रा.मुंबई तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्रीमती दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.
२) श्री.माधव वीर, सह सचिव, वित्त विभाग (व्यय), मंत्रालय, मुंबई.
३) श्री.राजश्री ठोकळ, संचालक (वित्त) प्रभारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
४) श्री.अजय सिंह, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.
५) श्री.प्रशांत भामरे, मुख्य अभियंता प्रभारी, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे

सर्व प्रथम सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १५४व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५४वी बैठक दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १५४व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५४व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी संपन्न झालेल्या १५४व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १५४व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेमार्फत प्रगतीपथावर असलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत राष्ट्रीय महामार्ग/रेल्वे क्रासिंगकरीता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे/भारतीय रेल्वे खात्याकडे जमा करावयाच्या परफार्मन्स बँक गॅरंटीसाठी लागणारी रक्कम म.जी.प्रा.च्या स्वनिधी/घसारा निधीतून उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी संचालक मंडळास अवगत केले.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत विविध पाणी पुरवठा योजनांसाठी राष्ट्रीय महामार्ग क्रॉसिंगकरीता, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाची परवानगी घ्यावी लागते. सदर परवानगी देताना भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून परफॉर्मन्स बँक गॅरंटीची मागणी करण्यात येते. सदर बँक गॅरंटीसाठी लागणारा खर्च जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत निधीमधून म्हणजेच, PFMS मधून अनुज्ञेय नसल्याने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर असलेल्या योजनांकरीता राष्ट्रीय महामार्ग क्रॉसिंगकरीता लागणारा निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून उपलब्ध करुन देण्याविषयी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या १५४ व्या बैठकीत प्रस्ताव सादर करुन त्यास मा.संचालक मंडळाने काही अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता दिली आहे.

जिल्हा परिषदेमार्फत प्रगतीपथावर असलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत राष्ट्रीय महामार्ग क्रॉसिंगकरीता, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे जमा करावयाच्या परफॉर्मन्स बँक गॅरंटीसाठी लागणारा खर्च जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत निधीमधून म्हणजेच, PFMS मधून अनुज्ञेय नसल्याने तसेच जिल्हा परिषदेकडे निधी उपलब्ध नसल्याने, महाराष्ट्र शासनाचे मा. मुख्य सचिव यांच्या दालनात दि.१६.६.२०२३ रोजी संपन्न झालेल्या जलजीवन मिशन अंतर्गत योजनांच्या आढावा बैठकीदरम्यान प्राप्त निर्देशानुसार यासाठी लागणारा निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधी/घसारा निधीतून उपलब्ध करुन दिल्यास रोड क्रॉसिंगची परवानगी प्राप्त करुन घेणे सुलभ होईल व जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत कामे वेळेवर पूर्ण करता येतील. सदर प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

मा.संचालक मंडळाच्या आगामी बैठकीत याविषयीची कार्यक्रम सादर करुन त्यास कार्योत्तर मान्यता घेण्याच्या अटीवर मा.मंत्री महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने, संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या कार्यालयाने याबाबतचे परिपत्रक दि.१३.७.२०२३ रोजी निर्गमित केले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव** :- असा ठराव करण्यात येतो की, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेमार्फत प्रगतीपथावर असलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत राष्ट्रीय महामार्ग/रेल्वे क्रॉसिंगकरीता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण/रेल्वे खात्याकडे जमा करावयाच्या परफॉर्मन्स बँक गॅरंटीसाठी लागणारी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधी / घसारा निधीतून उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**अटी :**

१. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत योजनांकरीता राष्ट्रीय महामार्ग/रेल्वे क्रॉसिंगकरीता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण/रेल्वे खात्याकडे जमा करावयाच्या परफॉर्मन्स बँक गॅरंटीसाठी लागणारी रक्कम भरण्यासाठीची निधी मागणी संबंधीत जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत संबंधीत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना सादर करावी. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर निधी मागणी संबंधीत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यामार्फत संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई यांना सादर करावी. सदर बँक गॅरंटीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून निधी मागणी करण्यात आल्यास योजनानिहाय निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठीची सर्वतोपरी कार्यवाही संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांच्या कार्यालयाने करावी.

२. योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर, परफॉर्मन्स बँक गॅरंटी तात्काळ मुक्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता यांची राहील. याबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संबंधीत जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा करावा.

३. याबाबतचे हमीपत्र निधी मागणी करताना, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सादर करणे बंधनकारक राहील.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव.
म.जी.प्रा.

४. त्याचप्रमाणे कामाच्या अंमलबजावणीच्या वेळी ठेकेदारांकडून झालेल्या काही नुकसानापोटी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण/रेल्वे खात्याकडून काही रक्कम वजाती करुन घेण्यात आल्यास अशा रक्कमेची वसूली संबंधीत ठेकेदाराकडून वसूल करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे जमा करण्याची जबाबदारी संबंधीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता यांची राहील.

५. या प्रकरणी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी याबाबतचा स्वतंत्र लेखा विहीत नमुन्यामध्ये ठेवावा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी बँक गॅरंटीबाबतचा दरमहा योजनानिहाय विहीत नमुन्यातील अहवाल मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत संचालक (वित्त) यांना सादर करावा. त्यास अनुसरुन संचालक (वित्त) यांनी दरमहा आढावा घेऊन सविस्तर अहवाल सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना अवलोकनार्थ सादर करावा.

६. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर असलेल्या योजनांच्या बाबतीत राष्ट्रीय महामार्ग क्रॉसिंग करीता जमा करावयाची परफॉर्मन्स बँक गॅरंटीची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून उपलब्ध करुन देण्यास मा.संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर रेल्वे क्रॉसिंगकरीता रेल्वे खात्याकडे जमा करावयाच्या परफॉर्मन्स बँक गॅरंटीची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधी/घसारा निधीतून उपलब्ध करुन देण्यात यावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४ :-** भारताचे नियंत्रक व लेखा परीक्षक यांच्याकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे लेखापरीक्षण सोपविण्याबाबत. (कालावधी ०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२७)

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ३५ मधील तरतुदीनुसार तसेच Comptroller and Auditor General's (Duties, Power and conditions of Service) Act १९७१ च्या कलम २० (१) नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे लेखा परीक्षण भारताचे नियंत्रक व लेखा परिक्षक यांच्याकडे सोपविले जाते. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दिनांक ०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२७ या कालावधीचे लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक व लेखा परीक्षक यांच्याकडे सोपविण्याचे

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

प्रस्तावित असून त्यास संचालक मंडळाची मान्यता घेण्याची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

याबाबत चर्चा करण्यात येऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव** :- असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दिनांक ०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२७ या कालावधीचे लेखापरीक्षण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ३४ मधील तरतुदीनुसार तसेच Comptroller and Auditor General's (Duties, Power and conditions of Service) Act १९७१ च्या कलम २० (१) नुसार भारताचे नियंत्रक व लेखा परीक्षक यांच्याकडे सोपविण्यात मान्यता देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १९८९ उपविधीतील कलम ५, ६,७,११ आणि १२ (अ) मधील दरात सुधारणा करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उपविधी १९८९ मधील कलम ५,६,७,११ आणि १२ मधील जलमापकाचे सध्याचे मासिक भाडे, जोडणीचे शुल्क, नळ जोडणी खंडीत करणे/पुर्नजोडणी करणे यासाठी सेवा शुल्क, जलमापक चाचणीचे सेवा शुल्क मध्ये यापुर्वी मा.संचालक मंडळाच्या १३६ व्या बैठकीत सन २०१६ मध्ये वाढ करण्यात आली होती. त्यानंतर आत्ता यामध्ये २५ ते ३० % दरवाढ करण्याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होउन संचालक मंडळाची मान्यता मिळाली असून खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

**ठराव** :-

ठराव करण्यात येतो की, उपविधीतील कलम क्र. ५,६,७,११ आणि १२ (अ) अंतर्गत प्राधिकरणाच्या (१) जलमापकाचे सध्याचे मासिक भाडे (२) जोडणीचे शुल्क (३) नळ जोडणी खंडीत करणे / पुनर्जोडणी यासाठी सेवा शुल्क (४) जलमापक चाचणीचे सेवा शुल्क (५) जलमापक काढणे व बसविणे (६) पाणी देयकासाठी जलमापकाचे सुरक्षा अनामत रक्कम (७) जलमापकाचे सील जोडणे/ जलमापकाचे सील तोडणे/जलमापकास हानी पोहचविणे यासाठी दंडात्मक कारवाई इत्यादीसाठी आकारण्यात येणारे भाडे/शुल्क वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याप्रमाणे खाली नमुद केलेल्या विविध बाबीच्या सुधारीत दराला मान्यता दिली आहे. याबाबत पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरण्याचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२) उपविधी कलम ५ तक्ता क्र. २ प्राधिकरणाच्या जलमापकाचे सुधारीत प्रति महा भाडे

(अ) जलमापकाचे भाडे

| अ.क्र. | जोडणी व्यास मि.मि. मध्ये | जोडणी व्यास इंचामध्ये | जलमापकाचे सुधारीत मासिक भाडे ( रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | ४५ |
| २ | २० | ३/४ | ५० |
| ३ | २५ | १ | १४५ |
| ४ | ४० | १ १/२ | २७० |
| ५ | * ५० | २ | ५५० |
| ६ | * ८० | ३ | ५९० |
| ७ | * १०० | ४ | ६५० |
| ८ | * १५० | ६ | ८२० |

* प्राधिकरणाने मीटर खरेदी केल्यास आकारले जाणारे मासिक दर

टिप :- १) प्राधिकरणाच्या उप अभियंता कार्यालयात १५ मि.मि. ते ४० मि.मि. व्यासाची जलमापके उपलब्ध नसतील तर ती ग्राहकांना बाजारातून उपलब्ध करुन द्यावीत.

२) ४० मि.मि. व त्यापेक्षा मोठया व्यासाची जलमापके ग्राहकाने स्वत: खरेदी करणे जरूरीचे आहे.

३) उपविधी कलम ६ तक्ता क्र.३ नळ जोडणी शुल्क, नळ जोडणी खंडीत करणे/पुनर्जोडणीसाठी सेवा शुल्क कलम ६ तक्ता क्र.३ (अ) जलमापक काढणे व बसविणे तसेच कलम क्र.६ तक्ता क्र ३ (अ) व ११ जलमापक चाचणी यांचे सेवा शुल्क

(ब) जोडणीचे शुल्क :

| अ.क्र. | जोडणी व्यास मि.मि. मध्ये | जोडणी व्यास इंचामध्ये | जोडणीचे सुधारीत सेवाशुल्क (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | ५७० |
| २ | २० | ३/४ | ५७० |
| ३ | २५ | १ | ११५० |
| ४ | ४० | १ १/२ | ११५० |
| ५ | ५० आणि पुढील | २ आणि पुढील | प्रत्यक्ष अंदाजपत्रकाप्रमाणे |

टिप :- १) जोडणीसाठी खोदाई आणि भरणी, ग्राहकाने स्वखर्चाने परवानाधारक नळ कारागिराकडून अभियंत्याच्या समक्ष करुन घ्यावयाची आहे.

२) फेरुल बसवायचे असल्यास फेरूलचा खर्च अतिरिक्त असून ग्राहकाने फेरूल स्वत:च्या खर्चाने खरेदी करून नळ जोडणीच्या वेळी उपलब्ध करून घ्यावयाचे आहे.

३) सुधारीत दर नागरी व ग्रामीण योजनासाठी समान राहतील.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

४) उपविधी कलम ६ नळ जोडणी खंडीत करणे / पुनर्जोडणीसाठी सेवा शुल्क

| अ.क्र. | जोडणी व्यास मि.मि. मध्ये | जोडणी व्यास इंचामध्ये | सुधारीत दर शुल्क( रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | ७०० |
| २ | २० | ३/४ | ७०० |
| ३ | २५ | १ | १२५० |
| ४ | ४० | १ १/२ | १२५० |
| ५ | ५० आणि पुढील | २ आणि पुढील | प्रत्यक्ष अंदाजपत्रकाप्रमाणे |

टिप :- १) खोदाई आणि भरणी करणेचा खर्च वरील शुल्कात समाविष्ट आहे.

२) सदर दर हे नागरी व ग्रामीण योजनासाठी समान राहतील.

उपविधी कलम ६ तक्ता क्र.३ (अ) जलमापक काढणे व बसविणे

(क) जलमापक काढणे व बसविणे

| अ.क्र. | जोडणी व्यास मि.मि. मध्ये | जलमापकाचा व्यास इंचामध्येज | जलमापक जागेवरुन काढणे व पुन्हा जागेवर बसविणे यासाठीचे सुधारीत सेवा शुल्क ( रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | ३४० |
| २ | २० | ३/४ | ३८० |
| ३ | २५ | १ | ५०० |
| ४ | ४० | १ १/२ | ६३० |
| ५ | ५० | २ | ७५० |
| ६ | ८० | ३ | १२५० |
| ७ | १०० | ४ | १५०० |

जलमापक चाचणीचे सेवाशुल्क :-

| अ.क्र. | जोडणी व्यास मि.मि. मध्ये | जलमापकाचा व्यास इंचामध्ये | जलमापकाचे चाचणीचे सुधारीत शुल्क भाडे (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | १३० |
| २ | २० | ३/४ | १९० |
| ३ | २५ | १ | २५० |
| ४ | ४० | १ १/२ | ३२० |
| ५ | ५० | २ | ३८० |
| ६ | ८० | ३ | ६३० |
| ७ | १०० | ४ | १२५० |
| ८ | १५० | ६ | - |

टिप :- १) सदर दर हे नागरी व ग्रामीण योजनांसाठी समान असून सेवा शुल्कात मिटर काढणे व परत बसविणेचे शुल्क समाविष्ट नाही.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

३.	उपविधी कलम ७ तक्ता क्र. ४ पाण्याच्या देयकासाठी आकारण्यात येत असलेले सुरक्षा अनामत रक्कम

(ड) पाण्याच्या देयकासाठी आकारण्यात करण्यात येत असलेले सुरक्षा अनामत रक्कम

| अ. क्र. | जलमापकाचा व्यास मि.मि. मध्ये | जलमापकाचा व्यास इंचामध्ये | घरगुती जोडणीसाठी अनामत शुल्क (रुपये) नागरी | बिगर घरगुती नळ जोडणीसाठी अनामत शुल्क (रुपये) | ना नफा तत्वावरील संख्यांची नळ जोडणी साठी अनामत शुल्क (रुपये) | ग्रामीण भागासाठी अनामत शुल्क (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | १९०० | ७६०० | ३८०० | ९५० |
| २ | २० | ३/४ | ३२०० | १४००० | ७००० | १६०० |
| ३ | २५ | १ | ५००० | १९००० | ९००० | २५०० |
| ४ | ४० | १ १/२ | ११५०० | ५०००० | २५००० | ५७०० |
| ५ | ५० | २ | १४००० | ६३००० | ३२००० | ७००० |
| ६ | ८० आणि ८० पेक्षा जास्त | ३ आणि ३ पेक्षा जास्त | सुरक्षा अनामतची रक्कम ६ महिन्याच्या पाण्याच्या जरुरीनुसार ठरविण्यात येईल. | - | - | |

टिप :- सुधारित सुरक्षा अनामत रक्कमेचे सुधारित दर दोन वर्षाच्या पाणी देयकाच्या आधारे अथवा साहित्य आणि मजूरीच्या किंमतीत झालेल्या वाढीवर सुरक्षा अनामत ठरविण्यात येतील.

४) कलम १२ (अ) जलमापकाचे सील तोडणे / जलमापकास हानी पोहचविणे यासाठी दंडाची रक्कम

| अ.क्र. | तपशील | सुधारीत दर (रुपये) |
|---|---|---|
| १ | जलमापकास अंशत: अथवा पूर्णत: हानी पोहोचलेली आढळल्यास | १३०० |
| २ | जलमापकाचे सील तुटलेले आढळल्यास आणि जलमापकास अंशत: अथवा पूर्णत: हानी पोहोचलेली आढळल्यास | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संबंधीत वर्षाच्या दरसुची प्रमाणे किंमत दंडात्मक रक्कम रु. ६५०/- सह आणि मीटरच्या शेवटच्या वाचनानुसार वापरलेल्या पाण्याची दुप्पट दराने वसुली |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.६ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१९-२० चे वार्षिक लेखा मंजूरीबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची १५५ वी बैठक दि.०९.०१.२०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत प्राधिकरणाचे सन २०१९-२० या वर्षाचे वार्षिक लेखे संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आले. वार्षिक लेख्याबाबतची सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सन २०१९-२० च्या वार्षिक लेख्यास, कार्यक्रम बाब क्र.६ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :-**

१) असा ठराव करण्यात येतो की, सन २०१९-२० या वर्षाचे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात आले आहेत.
२) असाही ठराव करण्यात येतो की, सन २०१९-२० या वर्षाचे वार्षिक लेखे प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकरणाचे मा.अध्यक्ष व सदस्य सचिव, यांनी प्रमाणित करावेत.
३) तसेच असाही ठराव करण्यात येतो की, स्वीकृत लेख्यांमध्ये मांडण्यात आलेल्या कामाच्या निष्कर्षामध्ये ज्यांच्यामुळे कोणताही महत्त्वाचा फरक पडणार नाही. अशा किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या प्राधिकरणाच्या संचालक (वित्त) व सदस्य सचिव, यांच्या स्वाक्षरीने करता येतील.
४) स्वीकृत लेखा महालेखापाल नागपूर, यांना लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे, इत्यादीसाठी सदस्य सचिव, यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२०-२१ चे वार्षिक लेखा मंजूरीबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची १५५ वी बैठक दि.०९.०१.२०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत प्राधिकरणाचे सन २०२०-२१ या वर्षाचे वार्षिक लेखे संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आले. वार्षिक लेख्याबाबतची सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सन २०२०-२१ च्या वार्षिक लेख्यास, कार्यक्रम बाब क्र. ७ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव:**

१) असा ठराव करण्यात येतो की, सन २०२०-२१ या वर्षाचे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात आले आहेत.

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

२) असाही ठराव करण्यात येतो की, सन २०२०-२१ या वर्षाचे वार्षिक लेखे प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकरणाचे मा.अध्यक्ष व सदस्य सचिव, यांनी प्रमाणित करावेत.

३) तसेच असाही ठराव करण्यात येतो की, स्वीकृत लेख्यांमध्ये मांडण्यात आलेल्या कामाच्या निष्कर्षामध्ये ज्यांच्यामुळे कोणताही महत्वाचा फरक पडणार नाही. अशा किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या प्राधिकरणाच्या संचालक (वित्त) व सदस्य सचिव, यांच्या स्वाक्षरीने करता येतील.

४) स्वीकृत लेखा महालेखापाल नागपूर, यांना लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे, इत्यादीसाठी सदस्य सचिव, यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१९-२० चा वार्षिक प्रशासनिक अहवाल संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी ठेवणे बाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१९-२० च्या वार्षिक प्रशासनिक अहवालाबाबत सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. याबाबतचा ठराव खालीलप्रमाणे पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१९-२० या वर्षाचा वार्षिक प्रशासनिक अहवाल स्विकृत करण्यात येत असून तो विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात पटलावर ठेवण्याची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.९ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०२०-२१ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी ठेवणे बाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०२०-२१ च्या वार्षिक प्रशासनिक अहवालाबाबत सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. याबाबतचा ठराव खालीलप्रमाणे पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०२०-२१ या वर्षाचा वार्षिक प्रशासनिक अहवाल स्विकृत करण्यात येत असून तो विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात पटलावर ठेवण्याची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१० :-** नगरोत्यान महाभियानांतर्गत शाहूनगर (सातारा शहर) नळ पाणी पुरवठा योजना ता.जि.सातारा (कृष्णा नदी उदभव)
स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याची वाढीव रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून उपलब्ध करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले.

शासनाच्या नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्र.नगरो-२०२२/प्र.क्र.३५८/नवि-३३, दि.९.०२.२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत सातारा शहराच्या रु.३४.३६ कोटी पाणी पुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर योजनेतील स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा रु.८.५९ कोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून (सदर योजनेच्या उत्पनातून तेवढी रक्कम पुन:श्च घसारा निधीमध्ये जमा करण्याच्या अटीच्या अधिन राहून) उपलब्ध करण्यास मा. संचालक मंडळाच्या दि.२५.०४.२०२३ रोजी झालेल्या १५४ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर कामाच्या रु. २६.६३ कोटी किंमतीच्या निविदेकरीता मे. दीपक जे. भिवरे, पुणे यांनी निविदा किंमतीवर १५.९०. टक्के जादा दराचा न्युनतम देकार सादर केला होता. सदर देकाराच्या अनुषंगाने ठेकेदरासोबत वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटी अंती ठेकेदाराने निविदा किंमतीवर १५.८०% जादा दराचा सुधारीत देकार सादर केला. तद्नंतर ठेकेदाराने विविध कारणे नमूद करुन देकार कमी करण्यास असमर्थता दर्शवली.

योजनेच्या प्रशासकीय मान्यतेनुसार मुळ प्रकल्प किंमतीमध्ये कोणत्याही कारणाने वाढ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहणार आहे. म्हणजेच सदर वाढीव खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत उभारावा लागणार आहे. उपरोक्त प्रमाणे ठेकेदाराचा देकार स्वीकृत केल्याने योजनेवर रु.४.५२ कोटी इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. यानुसार निविदा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२९.०८.२०२३ रोजी झालेल्या १६५ व्या निविदा समितीच्या बैठकीत निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. निविदा समितीच्या सदर बैठकीत योजनेवर होणारा रु.४.५२ कोटी वाढीव खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून उभारण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता घेण्याच्या अटीच्या अधीन राहून निविदा प्रस्तावास निविदा समितीने मान्यता दिलेली आहे.

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

उपरोक्त प्रमाणे चर्चा होऊन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत सातारा शहर (शाहूनगर) पाणी पुरवठा योजनेकरिता होणारा वाढीव खर्च रु.४.५२ कोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून उपलब्ध करण्यास खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव** :-

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत सातारा शहर (शाहूनगर) पाणी पुरवठा योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची योजना असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याची रक्कम रु.८.५९ कोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून (सदर योजनेच्या उत्पनातील तेवढी रक्कम पुन:श्च घसारा निधीमध्ये जमा करण्याच्या अटीच्या अधीन राहून) उपलब्ध करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दि. २५.०४.२०२३ रोजी झालेल्या १५४ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. आता सदर योजनेच्या रु. २६.६४ कोटी किंमतीच्या निविदेकरिता ठेकेदाराने निविदा किंमतीवर १८.८० टक्के जादा दराचा व निविदेच्या चालू दरसुचीनुसार येणाऱ्या मूल्यांकित किंमतीवर ४.०२% जादा दराचा सादर केलेला देकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२९.०८.२०२३ रोजी झालेल्या १६५ व्या निविदा समितीच्या बैठकीत स्वीकृत करण्यात आल्याने योजनेवर रु.४.५२ कोटी इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. योजनेच्या प्रशासकीय मान्यतेनुसार मुळ प्रकल्प किंमतीमध्ये कोणतेही कारणास्तव वाढ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहणार आहे. म्हणजेच वाढीव खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत उभारावा लागणार आहे. त्यामुळे योजनेवर होणारा रु.४.५२ कोटी वाढीव खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून (सदर योजनेच्या उत्पनातील तेवढी रक्कम पुन:श्च घसारा निधीमध्ये जमा करण्याच्या अटीच्या अधीन राहून) उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर रक्कम घसारा निधीतमध्ये पुन:श्च जमा करण्याची संपूर्ण जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची राहील.

**कार्यक्रम बाब क्र.११ :-** सुधारीत १७६ (१७३ सध्या) गावांची ग्रीड पाणी पुरवठा योजना ता.परतुर, मंठा व जालना- योजनेची देखभाल व दुरुस्त महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यासाठी देखभाल दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे व निविदा मागविण्यास परवानगी देण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

शासन निर्णयातील अटीनुसार, योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यासाठी मा.संचालक मंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२३.०८.२०१६ रोजी झालेल्या १३७ व्या सभेमध्ये, योजनेची महाराष्ट्र शासनाच्या वतीने देखभाल व दुरुस्ती करणे, योजनेतील समाविष्ट गावांना व इतर ग्राहकांना ठोक पाणी पुरवठा करणे व पाणीपट्टीची वसूली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यास तसेच मजीप्रामार्फत चालविण्यात येणाऱ्या इतर ग्रामीण पाणी पुरवठा योजना चालविताना आर्थिक तूट उद्भवल्यास शासनामार्फत त्याची प्रतिपूर्ती करण्यात येईल, या अटीवर १७६ गावांसाठीच्या योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्यास मा.संचालक मंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात आली असून, देखभाल-दुरुस्ती सुध्दा शासनाच्या वतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे.

सदर योजना चालविण्याकरीता अपेक्षित खर्च व संभाव्य उत्पन्न याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| सन | देखभाल-दुरुस्ती खर्च | पाणीपट्टी वसूली | पाण्याचा दर प्रति १००० ली. |
|---|---|---|---|
| २०२४ | रु.६५५.०० लक्ष | रु.६७९.०० लक्ष | रु.१२.०० |
| २०३५ | रु.११५३.३७ लक्ष | रु.११६१.०७ लक्ष | रु.१८.०० |

उपरोक्तनुसार, १७६ गांवे (सुधारित १७३ गांवे) ग्रीड पाणी पुरवठा योजनेच्या सन २०२३-२४ या कालावधीतील योजनेच्या देखभाल,दुरुस्ती व योजना चालविण्याच्या रु.६५५.५० लक्ष इतक्या अंदाजित खर्चाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी मुख्य अभियंता यांनी सादर केले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत मा.संचालक मंडळास विनंती करण्यात आली.

या बाबींवर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना अंतर्गत १७६ (सुधारित १७३ गांवे) ग्रीड पाणी पुरवठा योजनेच्या १ वर्षाच्या देखभाल व दुरुस्तीकरिता लागणाऱ्या रु.६५५.५० लक्ष खर्चाच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदरचा खर्च प्राधिकरणाच्या स्वनिधीतून करण्यास मान्यता देण्यात येत असून या प्रकरणी निविदा प्रक्रिया राबवून पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

अटी :

१. सदर प्रशासकीय मान्यता, योजना एक वर्षाच्या कालावधीकरीता चालविण्यासाठी देण्यात येत आहे. या कालावधीमध्ये योजना चालविण्याचा खर्च व पाणीपट्टी वसूली यांचा विचार करुन, पुढील कालावधीचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत विचार करण्यात येईल.

२. योजनेचा देखभाल, दुरुस्ती व चालविण्याचा खर्च मंजूर किंमतीपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. योजनेतील समाविष्ट गावांकडून व इतर ग्राहकांकडून पाणीपट्टीची वसूली करण्याची जबाबदारी क्षेत्रिय कार्यालयाची राहील. वसूलीबाबचा नियमितपणे आढावा घेऊन वसूली व खर्चावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील.

४. योजनेची पाणीपट्टी नियमित भरणे, वसूली करणे इत्यादी विषयी आवश्यक करारनामा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद/ग्रामपंचायत यांच्यामध्ये करुन घेण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील.

५. सदर प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने, शासनाच्या प्रचलित नियमानुसार या कामाची निविदा प्रक्रिया राबवून पुढील कार्यवाही करावी.

**कार्यक्रम बाब क्र.१२ :-** शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता. सांगोला, जि.सोलापूर. दैनंदिन देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करणे.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दि.२५.०६.२००६ रोजी झालेल्या १०४ व्या बैठकीच्या इतिवृत्तातील कार्यक्रम बाब क्र.६ अन्वये शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्रथम १५ वर्षाकरीता चालविण्यास तसेच योजना प्राधिकरणामार्फत चालविण्याकरीता दरवर्षी प्राधिकरणाला जी काही आर्थिक तुट येईल त्याची भरपाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास व त्याची प्रतिपूर्ती मागण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार तसेच शासन निर्णय ग्रापापु-१००५/प्र.क्र.१३६/पापु-७, दि.१०.०८.२००५ नुसार सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात आली. प्रथम १५ वर्षाकरीता योजना चालविण्याची मुदत मार्च-२०२० मध्ये संपली असून त्यानंतरही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात आली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४८ व्या बैठकीत सदर योजना देखभाल दुरुस्तीकरीता जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला तसेच योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्याकरीता हस्तांतरणापर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला जी काही आर्थिक तूट येईल त्याची भरपाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करुन त्याची प्रतिपूर्ती मागणी करण्याबाबत ही निर्णय घेण्यात आला.

सदर योजनेकरीता जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा करूनही जिल्हा परिषद हस्तांतरित करून घेण्यास असमर्थता दर्शवित असल्याने, विविध मुद्दे नमूद करून कार्यक्रम बाबीद्वारे प्रस्ताव मा.संचालक मंडळाच्या दि.१८.१०.२०२२ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीत निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. सदर बैठकीत काही अटींच्या अधीन राहून योजनेची देखभाल व दुरुस्ती मजीप्रामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून योजनेच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती खर्चाच्या आर्थिक तुटीची प्रतिपुर्ती शासनाकडून होणेकरीता शासनास विनंती करण्यात आलेली आहे. तथापि. अद्याप तुटीची प्रतिपुर्ती शासनाकडून करण्यात आलेली नाही. शासनाकडून तुटीची प्रतिपुर्ती न झाल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या १५३ व्या बैठकीच्या निर्णयानुसार सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालू न ठेवणे अपेक्षित आहे.

ॲड.शहाजीबापू राजाराम पाटील विधानसभा सदस्य ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी त्यांचे पत्र क्र.जा.क्र.९६१/२०२३/२०२४ दि.१८.१०.२०२३ अन्वये शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनासाठी माहे नोव्हेंबर २०२२ पासून देखभाल दुरुस्ती, वीज बिल, पाणी बिल, रसायन बिल इत्यादीसाठी निधी वितरित झालेला नसल्याने योजना चालू ठेवण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी, योजना बंद पडण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत सांगोला तालुक्यात दुष्काळ परिस्थिती कायम असून या तालुक्यातील गावांना सदर योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर योजनेसाठी रु.३००.०० लक्ष इतका निधी शासनाकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग करण्याचे आदेश संबंधितांना होणेबाबत मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांना केली आहे. सदर पत्रावर मा.मंत्री महोदयांनी प्रस्ताव मंजूरीबाबत उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

सदर योजना जिल्हा परिषदेने हस्तांतरित करुन घेण्यास दर्शविलेली असमर्थता तसेच सद्यस्थितीत सांगोला तालुक्यात दुष्काळ परिस्थिती कायम असून या तालुक्यातील गावांना सदर योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु ठेवणे आवश्यक असल्याची बाब विचारात घेऊन सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत आला.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

ठराव :-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या दि.१८.१०.२०२२ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीमध्ये शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना काही अटींच्या अधीन राहून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्याकरिता मजीप्राला जी काही आर्थिक तुट येईल त्याची भरपाई शासनाकडून होणेबाबतची हमी/मान्यता शासनाकडून ३ महिन्यात प्राप्त करावी तोपर्यंत योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने चालवावी शासनाने मान्यता न दिल्यास योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून बंद करण्यात यावी. तसेच ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्याकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला जी काही आर्थिक तुट येईल त्याची भरपाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करुन त्याची प्रतिपुर्ती मागणी करण्यात यावी, या अटींचा समावेश आहे. तथापि, शासनास वेळोवेळी आर्थिक तुटीची प्रतिपुर्ती करणेबाबत विनंती करूनही प्रतिपुर्ती न झाल्याने मा.संचालक मंडळाच्या उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने या योजनेच्या देखभाल दुरुस्तीकरीता निधी वितरित करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. ॲड.शहाजीबापू राजाराम पाटील, विधानसभा सदस्य ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांना सदर योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु ठेवणे आवश्यक असल्याबाबत केलेली विनंती या अनुषंगाने सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करणेबाबत खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता.सांगोला, जि.सोलापूर या योजनेच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती खर्चाच्या आर्थिक तुटीची प्रतिपुर्ती शासनाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी मुख्य अभियंता यांनी शासन स्तरावर पाठपुरावा करावा. आर्थिक तुटीची प्रतिपुर्ती पुढील ३ महिन्यांच्या कालावधीमध्ये शासनाकडून प्राप्त झाल्यास, योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालू ठेवावी, अन्यथा ३ महिन्यानंतर योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत बंद करण्यात यावी.

२. सदर योजनेच्या पाणीपट्टीच्या वसुलीची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील. पाणीपट्टीची पूर्ण वसुली होईल याबाबत मुख्य अभियंता यांचे नियोजन व संनियंत्रण राहील.

३. सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला जी काही आर्थिक तुट येईल त्याची भरपाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करुन त्याची प्रतिपूर्ती मागणी करण्यात यावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१३ :-** राज्य सार्वजनिक उपक्रमाचा तात्पुरता शिल्लक निधी शासनाच्या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने राष्ट्रीयकृत बँकांमध्ये केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकारण, संचालक मंडळाची बैठक दि. ०९.०१.२०२४ रोजी संपन्न झाली. महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाकडील शिल्लक निधी राज्य शासनाचा शासन निर्णय वित्त विभाग क्र.शासाऊ-१०.१५/प्र.क्र.४२/सा.ऊ.दि.२७.१०.२०१५ व वित्त विभाग क्र. संकीर्ण २०२०/ प्र.क्र.५१/२०/ कोषा प्रशा-५ दि.१३.०३.२०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार अल्प व दिर्घ मुदतीत गुंतवणुक करण्यात येत असते. तसेच तीच अल्प व दिर्घ मुदतीची गुंतवणुक दि.१३.०३.२०२० च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार राष्ट्रीयकृत बँकेमध्ये करण्यात आलेली आहे.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दि. ०१.०९.२०२१ ते ३०.१०.२०२३ या कालावधीमध्ये केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीचा गुंतवणुकीस मान्यता देण्यात येत आहे. याबाबत आवश्यक पुढील कार्यवाहीसाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१४ :-** म.जी.प्रा. जल व्यवस्थापन विभाग, अंबरनाथ साठी सन २०२३-२४ अंतर्गत सुधारीत अर्थसंकल्पीय तरतुद मंजूर करणेबावत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जल व्यवस्थापन विभाग, अंबरनाथ करिता सन २०२३- २०२४ या वित्तीय वर्षाकरिता पाणी पुरवठा केंद्रासाठी देखभाल व दुरुस्ती ( स्थापत्य ) साठीचे अर्थसंकल्पिय तरतूद संपल्याने विभागाने रक्कम रुपये ५.०० कोटी वाढीव तरतूदीची मागणी केली आहे. पाणी पुरवठा केंद्रासाठी देखभाल व दुरुस्ती ( स्थापत्य ) साठीचा खर्च सदर योजना चालविण्यासाठी आवश्यक असल्याने सन २०२३-२०२४ मधील अर्थसंकल्पिय तरतूदीत वाढ करणे बाबत मा. संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली व पुढील प्रमाणे ठराव पारित करण्यात आहे.

**ठराव :-**

ठराव करण्यात येतो की, अंबरनाथ (बदलापूर) पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल व दुरुस्तीच्या (स्थापत्य) कामांसाठी वाढीव रु.५.०० कोटी इतक्या निधी मंजूर करुन सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पिय तरतूदीत वाढ करण्याबाबत मान्यता देणेत येत आहे. या बाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव तसेच संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१५ :-** मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागपूर यांचे कार्यालयातील दुरुस्ती व कार्यालयांतर्गत आवश्यक साहित्यांकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले.

मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर कार्यालयातील दुरुस्ती व कार्यालयांतर्गत आवश्यक साहित्याकरिता कामांचे रु.१,८०,९६,४६०/- (जीएसटी सह) इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक मंजूरीकरिता सादर केले आहे.

१. सदर अंदाजपत्रकात पेव्हर ब्लॉक बसविणे, ॲल्युमिनियम खिडक्या बसविणे तसेच खिडक्यांना ग्रील बसविणे प्रादेशिक विभागीय कार्यालयाच्या इमारतीचे Rain Water Harvesting करणे इ. स्थापत्य कामे तसेच कार्यालयीन कामांकरिता पंखे, लाईट, ए.सी. प्रोजेक्टर, साऊंड सिस्टीम तसेच Invertor व Battery बसविणे, संपूर्ण इमारतीला CCTV Cameras बसविणे इ. बाबींचा समावेश आहे.

२. वस्तू व सेवा कर १८% इतका गृहित धरलेला आहे.

३. या कामाचे अंदाजित किंमतीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. संचालक मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर मुख्य अभियंता नागपूर यांनी सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केल्यानंतर निधी तरतूद करण्याबाबत कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

४. सदर प्रस्तावास व रु.१,८०,९६,४६०/- इतक्या खर्चास मान्यता देणे प्रस्तावित आहे.

या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागपूर कार्यालयातील दुरुस्ती व कार्यालयांतर्गत आवश्यक साहित्याकरिता कामांचे रु.१,८०,९६,४६०/- (जीएसटी सह) इतक्या किंमतीच्या प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधी / घसारा निधीतून उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर रक्कमेच्या मर्यादेतच खर्च करण्यात यावा.

२. सदर अंदाजपत्रकास मुख्य अभियंता यांनी सखोल तपासणीअंती तांत्रिक मान्यता द्यावी व

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

तद्नंतरच, प्रचलित पध्दतीनुसार कामे पूर्ण करण्यात यावीत.

३. काही अत्यावश्यक बाबींमुळे खर्चात वाढ होत असल्यास, त्यास प्रथम सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेण्यात यावी व तद्नंतर वाढीव खर्चाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

**कार्यक्रम बाब क्र.१६ :-** जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सेन्सर आधारित IoT Solution आधारित उपक्रमाच्या देखभाल दुरुस्तीबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले.

१. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांचे संनियत्रण व दैनंदिन मोजमाप याकरीता राज्य पाणी व स्वच्छता मिशनमार्फत आयओटी सोल्युशन उपक्रमाची अंमलबजावणी हाती घेण्यात आली आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निविदेतील अनुक्रमे ५०%, ३०% व २०% काम देण्याच्या अटीनुसार १) मे.सेंसीस टेक लिमिटेड (L१), २) मे.इन्डो अलाईड फुड प्रा.लि.- चेतास प्रा.लि.(L२) व ३) मे.राईट वॉटर सोल्युशन (इंडीया) प्रा.लि.-एबीएम नॉलेजवेअर (L३) या तीन संस्थांची निवड करण्यात आली आहे.

२. या उपक्रमाच्या अंमलबजावणीस राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीच्या दि. ०८.०२.२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली आहे. या उपक्रमास Centralised Control Room, Cloud Services आणि देखभाल दुरुस्तीचा खर्च राज्य शासनामार्फत करण्याच्या तसेच केवळ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी आय.ओ.टी. प्रणाली आवश्यकतेनुसार वापरण्याबाबतच्या अटीवर केंद्र शासनामार्फत मान्यता देण्यात आली आहे.

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर असणाऱ्या सुमारे ३८९ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनामध्ये आवश्यकतेनुसार हा उपक्रम राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

४. ३८९ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांमध्ये या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या सुमारे रु.४६७.६९ कोटी इतक्या खर्चापैकी सेंसर इ.साठी लागणारा खर्च सुमारे रु.४३६.७८ कोटी जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत केंद्र व राज्य हिस्सा प्रत्येकी ५०% असणार आहे.

५. तसेच Centralised Control room इ.साठी लागणारा खर्च सुमारे रु.३० कोटी हा खर्च पूर्णपणे राज्य हिस्स्यातून करण्याचे प्रस्तावित आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

६. उपरोक्त बाबींच्या देखभाल व दुरुस्तीच्या खर्चापोटी (सेंसर इत्यादीसाठी रु.१३३.२२ कोटी व अन्य बाबींसाठी रु.२४.०० कोटी) ५ वर्षांसाठी पुढीलप्रमाणे एकूण रु.१५७.२२ कोटी (करांव्यतिरिक्त) इतका खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून करावयाचा आहे.

| Year | Field Instrument (Rs. Cr.) | Integrated Central Constrol Center (Rs. Cr.) | Total (Rs. Cr.) |
|---|---|---|---|
| I | ३% (१३.१०) | १६% (४.८०) | १७.९० |
| II | ५% (२१.८४) | १६% (४.८०) | २६.६४ |
| III | ७.५% (३२.७६) | १६% (४.८०) | ३७.५६ |
| IV | ७.५% (३२.७६) | १६% (४.८०) | ३७.५६ |
| V | ७.५% (३२.७६) | १६% (४.८०) | ३७.५६ |
| Total | १३३.२२ | २४.०० | १५७.२२ |

७. उपरोक्त खर्च एकूण ३८९ प्रादेशिक योजनांकरिता आहे. त्यापैकी ज्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येते केवळ अशा योजनांकरिताच Field Instrument या बाबीच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च मजीप्रामार्फत करण्यात येईल. तथापि. Integrated Central Constrol Center या बाबीच्या देखभाल व दुरुस्तीचा सर्व खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.

या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सेंसर आधारीत आय.ओ.टी. सोल्युशन उपक्रमाच्या देखभाल दुरुस्तीबाबतच्या कामांचे (सेंसर इत्यादीसाठी रु.१३३.२२ कोटी व अन्य बाबींसाठी रु.२४.०० कोटी) असे ५ वर्षांसाठी एकूण रु.१५७.२२ कोटी (करांव्यतिरिक्त) इतक्या किंमतीच्या प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधी/घसारा निधीतून उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. ज्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येते केवळ अशा योजनांकरिताच Field Instrument या बाबीच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.

२. Integrated Central Constrol Center या बाबीच्या देखभाल व दुरुस्तीचा सर्व खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

३. उपरोक्तप्रमाणे खर्च करताना, सदर खर्चाचा समावेश करुन इतर खर्चासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रचलित पध्दतीनुसार, पाण्याचा दर परिगणित करण्यात यावा. तसेच सदर पाण्याच्या दराप्रमाणे पाणीपट्टीची आकारणी व वसुली करण्यात यावी.

**कार्यक्रम बाब क्र.१७ :-** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ९५ गावे ग्रीड पाणी पुरवठा योजना, ता.मंठा, जि.जालना योजनेची देखभाल दुरुस्ती व पाणी पट्टी वसुली म.जी.प्रा.मार्फत करणे.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ९५ गांवे ग्रीड पाणी पुरवठा योजना ता. मंठा जि. जालना या योजनेस, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.२८.६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदरील प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयातील अट क्र.२ अन्वये, सदर योजनेचे कार्यान्वयन, संचलन व देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल असे नमूद आहे. त्यामुळे सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती व पाणीपट्टीची वसूली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्याविषयीचा प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे योजनेची देखभाल व दुरुस्ती व पाणीपट्टीची वसूली करण्याकरीता कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे, ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत खाजगी कंत्राटदार नेमून देखभाल व दुरुस्ती व पाणीपट्टीची वसूली करणे आवश्यक आहे. त्यानुसार, वरील सर्व बाबी विचारात घेऊन, सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्याविषयीची कार्यक्रम बाब सादर करण्यात आली होती.

सदर योजना चालविण्याकरीता येणारा अपेक्षित खर्च व संभाव्य उत्पन्न याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| सन | देखभाल-दुरुस्ती खर्च | पाणीपट्टी वसूली | पाण्याचा दर प्रति १००० लि. |
|---|---|---|---|
| २०२४ | रु.४३४.२८ लक्ष | रु.४६८.३० लक्ष | रु.१३.३४ |
| २०३५ | रु.९४४.१३ लक्ष | रु.९८१.८७ लक्ष | रु.२३.८७ |

वरील बाबीवर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ९५ गांवे ग्रीड पाणी पुरवठा योजना ता.मंठा जि.जालना या योजनेची महाराष्ट्र शासनाच्या वतीने देखभाल व दुरुस्ती करणे, योजनेतील समाविष्ट गावांना व इतर ग्राहकांना ठोक पाणी पुरवठा करणे व पाणीपट्टीची वसूली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल या अटीवर रु.४३४.२८ लक्ष खर्चाच्या अंदाजपत्रकास व ९५ गांवे ग्रीड पाणी पुरवठा योजनेची केवळ १ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करण्यास मा.संचालक मंडळ मान्यता देत आहे.

या योजनेच्या बाबतीत नियमित पाणीपट्टी भरणे/वसूली करणे विषयी आवश्यक तो करारनामा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद/ ग्रामपंचायत यामध्ये करुन घ्यावा. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१८ :-** अमृत अभियान-१ अंतर्गत अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याची रक्कम उभारण्याकरिता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून पुढील ४ वर्षात परतावा करण्याच्या अटीच्या अधीन राहून निधी उपलब्ध होणेबाबत.

अमृत अभियान – १.० अंतर्गत अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी उर्वरीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याची रक्कम रुपये १.७८ कोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधी/ घसारा निधीतून पुढील ४ वर्षात परतावा करण्याच्या अटींचे अधीन राहून मंजूरी देणेबाबत सन २०१६ रोजीचे १३७ संचालक मंडळाच्या बैठकीत रुपये २८.५९ कोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (२५%) भरण्यास मान्यता दिली होती. सदर रक्कम घरगुती/बिगर घरगुती ग्राहकांकडून पुढील २ वर्षात १२ समान हप्त्यात वसूल करण्यास मान्यता दिली होती. तथापि, सदर रक्कमपैकी १.७८ कोटी वसूल न झाल्याने व योजना कार्यान्वित राहणे आवश्यक असल्याने ४ वर्ष परातावा करण्याचे अटींच्या आधीन राहून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून/घसारा निधीतून उपलब्ध करुन देण्याबाबतच्या कार्यक्रम बाबींवर मा. संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली व पुढील प्रमाणे ठराव पारित करण्यात आहे.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, अमरावती प्रादेशिक विभागांतर्गत, अमरावती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभागा मार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यांत येत असलेल्या अमरावती पाणी पूरवठा योजनेच्या (अमृत अभियान १.०) कामाकरीता वित्तीय आकृतीबंधानुसार 25% स्थानिक स्वराज्य

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

संस्थेच्या हिश्याची रक्कम उभारतांना येत असलेल्या अडचणींचा सारासार विचार करून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याची रक्कम उर्वरीत रक्कम रू. १७८.३५ लक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून/घसारा निधीतून तुर्तास उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने व सदरहु रक्कम पूढील ५ वर्षात परतावा करण्याच्या अटीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे. सदर रक्कम वसुल करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीत जमा करण्या बाबतची जबाबदारी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अमरावती यांची राहील.

याबाबत पूढील कार्यवाहीसाठी मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१९ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी ग्रामीण पाणी पुरवठा योजना डोंगराळ/पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन योजनेमधून होणा-या पाणी पुरवठयाचे दर दिनांक १ जुलै, २०२३ पासून लागू करण्याचे सुधारीत दर.

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होउन संचालक मंडळानी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजना डोंगराळ/पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन पाणी पुरवठा नागपूर पेरी अर्बनचे पाणी दर सुधारीत करणेबाबतच्या दिनांक १५.०६.२०२३ रोजीचे अधिसूचनेत नागपूर पेरी अर्बन पाणी पुरवठा दरवाढ केली नव्हती. त्यामुळे नागपूर पेरी अर्बनचे पुरवठा योजनेची दिनांक १.७.२०२३ पासून लागू करण्याचे सुधारीत दरवाढीचे शासनाचे राजपत्र अधिसूचना दिनांक १५.०६.२०२३ मधील परिशिष्ट ४ विवरणपत्र ७ पृष्ठ क्रमांक ११ मध्ये समाविष्ठ करणेसाठी शुध्दीपत्रक काढण्यासाठी ठराव पारित करण्यात आला आहे.

| परिशिष्ट -४ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पेरी अर्बन पाणी पुरवठा योजना व पाणी पुरवठा केंद्रे (पाण्याचे दर प्रति १००० लिटर) | | | | | |
| | | विवरणपत्र ७ | | (पृष्ठ क्र. ११) | |
| अ. क्र. | पुरवठयाचा प्रकार | १.जळोची | २. पिंपरी मधे | ३. आर्वी | ४. नागपूर पेरी अर्बन |
| | | प्रस्तावित दर | प्रस्तावित दर | प्रस्तावित दर | प्रस्तावित दर |
| १ | घरगुती मापन यंत्र बसविलेले | | | | |
| | १५००० लिटर पर्यत (प्रत्येक महिन्याला) | २०.९० | २०.९० | २०.९० | २०.९० |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १५००१ ते २५००० लिटर पर्यत | ३२.२३ | ३२.२३ | ३२.२३ | ३२.२३ |
| | २५००० लिटर च्या पुढे | ४३.८९ | ४३.८९ | ४३.८९ | ४३.८९ |
| २ | घरगुती मापन यंत्र न बसविलेले | | | | |
| ३ | बिगर घरगुती मापन यंत्र बसविलेले | ५९.६२ | | ४०.२६ | |
| ४ | व्यवसायिक | | ९६.६९ | ९६.६९ | ९६.६९ |
| ५ | संस्था | ४०.२६ | | | ४०.२६ |
| ६ | इतर | | ४०.२६ | | |

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, शासनाचे राजपत्र अधिसूचना दि. १५/०६/२०२३ मधील परिशिष्ट-४, विवरणपत्र ७ मध्ये नमुद केल्या प्रमाणे शुध्दिपत्रक काढण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत सदस्य सचिव यांना पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.२० :-** ठाणे येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे २ भूखंड ठाणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत...

१. ठाणे (प.) येथील गडकरी रंगायतन शेजारील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जागा ठाणे महानगरपालिकेस 'सार्वजनिक पार्किंग' व्यवस्थेकरीता उपलब्ध करुन देणेबाबत;

२. अ) कोपरी, ठाणे (पु.) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जागा ठाणे महानगरपालिकेस 'क्लस्टर डेव्हलपमेंट' करिता उपलब्ध करुन देणेबाबत; व

ब) कोपरी, ठाणे (पु.) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जागा ठाणे महानगरपालिकेस 'सॅटीस' प्रकल्पाकरिता उपलब्ध करुन देणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दि.१८.१०.२०२२ रोजीच्या १५३ व्या बैठकीत ठाणे येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे २ भूखंड ठाणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत ठराव पारित करण्यात आला होता. सदर ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हस्तांतरीत करावयाच्या बदल्यात ठाणे महानगरपालिकेने देवु केलेला भुखंड व बांधकामाबाबत दिनांक २६.१२.२०२३ रोजीचा ठाणे महानगरपालिकेचा सुधारीत प्रशासकीय ठराव प्राप्त झाला होता. दि. ०९.०१.२०२४ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५५ व्या आयोजित

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

बैठकीसमोर सदरचा प्रस्ताव ठेवण्यात आला. सदर बैठकीत सदरील प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की,

१. ठाणे (प.) येथील गडकरी रंगायतन शेजारील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचा २,१९३.३७ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड व त्यावरील अस्तित्वातील ८९३.७९ चौ.मी. बांधकाम ठाणे महानगरपालीकेस 'सार्वजनिक पार्किंग' व्यवस्थेकरीता तसेच, मौजे कोपरी सि.स.नं. १०२५(पै),कोपरी, ठाणे(पु.) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचा ३,७२६.०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड व त्यावरील अस्तित्वातील १६५१.४३ चौ.मी. बांधकाम 'क्लस्टर डेव्हलपमेंट' व 'सॅटीस' प्रकल्पाकरीता असे एकूण ५९१९.३७ चौ.मी. क्षेत्रफळाचे भूखंड ठाणे महानगरपालीकेस उपलब्ध करुन देण्यास व सदर भुखंडांच्या मोबदल्यात ठाणे महानगरपालीकेच्या मालकीचे मौजे बाळकूम येथील स.क्र. ९९,१००,१०१ व १० येथील ६७५७.७३ चौ.मी. क्षेत्राचा सुविधा भुखंड ठाणे महानगरपालीकेकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यास या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उक्त सुविधा भुखंडावर ठाणे महानगरपालीकेच्या दि.२६.१२.२०२३ रोजीच्या सुधारीत प्रशासकीय ठरावाद्वारे निश्चित केलेले दिडपट बांधकाम ठाणे महानगरपालीकेने करुन सदर बांधकाम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यास या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जागेचे मुल्यांकन अंदाजे रु. २३.४१ कोटी असून ठाणे महानगरपालिकेकडून बाळकुम येथे प्राप्त होणाऱ्या जागेचे मुल्यांकन अंदाजे २२.४३ कोटी इतके आहे. उपरोक्त मुल्यांकनामध्ये अंदाजे ९८ लक्ष इतक्या किंमतीचा फरक दिसून येतो, तथापी सुविधा भुखंडावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बांधकामाच्या दिडपट बांधकाम महानगरपालिकेकडुन करुन देण्यात येणार आहे. व या बांधकामाचा बाजारमुल्य दरपत्रकानुसार येणारा खर्च अंदाजे रु.१०.१६ कोटी इतका असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अस्तित्वातील कार्यालये व इमारतींची सद्याची घसारा किंमत (Depreciation Value) विचारात घेता ठाणे महानगरपालिकेकडून नवीन बांधकाम उपलब्ध होणार असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या भविष्याच्या दृष्टीने हिताचे आहे, तसेच अस्तित्वातील कार्यरत असलेली महाराष्ट्र

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

जीवन प्राधिकरणाची कार्यालय व निवासस्थाने या सर्वांकरीता पर्यायी जागा/व्यवस्थेची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मागणी केलेली आहे. याबाबत सद्यस्थितीत ठाणे महानगरपालिकेकडे जागा उपलब्ध नाही. तथापी, अश्या स्वरुपाची जागा ठाणे महानगरपालिकेस उपलब्ध झाल्यास तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी व्यवस्था म्हणून ठाणे महानगरपालिकेकडुन प्राप्त होईपर्यंत सद्य:स्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या मुख्य प्रशासकीय इमारत, कन्हैयानगर, कोपरी कॉलनी, ठाणे (पुर्व) येथील इमारतीमध्ये जागा उपलब्ध असुन.सदर कार्यालये या इमारतीमध्ये स्थलांतरीत करता येतील. परिणामी याबाबतचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर अतिरिक्त आर्थिक बोजा येणार नसल्याने प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यास संचालक मंडळाची या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे

प्रस्तुत प्रकरणी पुढील आवश्यक अनुषांगिक कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करणेत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.२१ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील भारतीय स्टेट बँकेत असलेले. ३३ बचत खाते दुस-या इतर बँकेत हलविणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकारण, संचालक मंडळाची बैठक दि. ०९.०१.२०२४ रोजी संपन्न झाली. भारतीय स्टेट बँक यांचेकडील ३३ बचत खाते शासन निर्णय वित्त विभाग क्र.शासाऊ - १०.१५/प्रक्र.४२/ सा.ऊ. दि. २७.१०.२०१५ व वित्त विभाग क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा ५ दि.१३.०३.२०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार शासनाकडून वेळोवेळी मार्गदर्शक सुचना निर्गमीत केल्यानुसार बचत खाते इतर कोणत्याही बँकेत हलविण्यात येणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे ३३ बचत खाते दि. ०३.०१.२०२४ चे प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे भारतीय स्टेट बँकेत असलेले खाते गरज पडल्यास आवश्यकतेनुसार इतर बँकेत हलविण्यास सदस्य सचिव यांना अधिकार प्रदान करण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे व या संदर्भाने अनुषंगीक कार्यवाहीसाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ :-**

**विषय :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी/ग्रामीण पाणी पुरवठा योजना (अंबरनाथ व बदलापूर) साठी दि.१ जुलै, २०२३ पासून सुधारीत पाणी पट्टीची १० टक्के दरवाढ कमी करणेबाबत कार्यक्रम बाब सादर करणेबाबत.

मा. आमदार डॉ.बालाजी किणीकर यांचे मागणीनुसार मागिल पावसाळी अधिवेशनात मा.मंत्री महोदयांनी अंबरनाथ बदलापूर पाणी पुरवठा दरात दि. १.७.२०२३ पासून केलेली दरवाढ रद्द करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार दि. १.१२.२०२३ चे शुध्दीपत्रकाव्दारे किरकोळ ग्राहकांसाठी लागू केलेली १०% दरवाढ रद्द करण्यात आली आहे. सदर शुध्दीपत्रकाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होउन संचालक मंडळाची मान्यता मिळाली असून खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, सदस्य सचिव, म.जी.प्रा.मंबई कार्यालयाचे जा.क्र. म.जी.प्रा./ वित्त-२/ परिव्यय / निधी १४७ दि.१५/०६/२०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार सुधारित करण्यात आलेल्या पाणी पट्टीच्या दरामध्ये करण्यात आलेली १० टक्के वाढ किरकोळ ग्राहकांच्या पाणी पट्टीसाठी रद्द करण्यात येत आहे. तसेच मा.मंत्री महोदय (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या मान्यतेने प्रसिध्द केलेले जा.क्र.मजीप्रा/वित्त-२/निधी/३१५ दिनांक ०१.१२.२०२३ रोजीच्या शुदधीपत्रकास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. या बाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना देण्यात येत आहेत.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.